# University of Mumbai

Phone - 022-2270 3248
Phone - 022-2270 8729
E-mail - universitythesis2011@gmail.com

Thesis Section,
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road,
Mumbai – 400 032.


प्रबंध विभाग/आय.सी.सी/२०१९–२०/४३३ २७ ऑगस्ट, २०१९.

## परिपत्रक

**विषय :– शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या वर्षासाठी संशोधन संस्थेच्या मान्यतेचे अर्ज.**

मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील संशोधन केंद्राचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संशोधन संस्थांचे संचालक / आणि संशोधन विभाग तसेच, विद्यापीठ विभागांचे विभागप्रमुख यांना असे कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील केंद्रासाठी प्रथम मान्यता **(First Time Recognition)** /सलग मान्यता **(Continuation of Recognition)** / विस्तारिकरणांतर्गत अस्तित्वात असणाऱ्या विद्याशाखेच्या नविन अभ्यासक्रमांची मान्यता **(Extension of Recognition for New Course under same Faculty)**/ विस्तारिकरणांतर्गत वेगळया विद्याशाखेच्या नविन अभ्यासक्रमांची मान्यता **(Extension of Recognition for New Course under Different Faculty)**/ अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेमध्ये वाढ किंवा घट **(Increase or Decrease in intake capacity)** तसेच कायम मान्यता **(Permanent Recognition)** इत्यादी बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या **सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम १११** च्या तरतुदींनूसार इच्छुक संस्थांनी खालील वेळापत्रकानूसार आपले अर्ज/प्रस्ताव सादर करावे.

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या वर्षासाठी मान्यतेबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे :

| | प्रकिया | कालबध्द कार्यक्रम |
|---|---|---|
| १. | विविध महाविद्यालये/शैक्षणिक/ संशोधन संस्था आपले विहीत नमुन्यातील अर्ज कुलसचिव कार्यालयास सादर करतील. (अर्ज स्विकारण्याची शेवटची तारिख) | ३० सप्टेंबर, २०१९ |
| २. | प्राप्त अर्जाची विद्यापीठाद्वारे छाननी व त्रुटी असल्यास संबंधितांना कळवणे आणि त्यांची त्रुटी पुर्तता करुन घेणे. | ऑक्टोबर, २०१९ |
| ३. | स्थानिक चौकशी समितीची भेट | नोव्हेंबर व डिसेंबर, २०१९ |
| ४. | विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची मान्यता घेणे | जानेवारी, २०२० |
| ५. | मान्यतेबाबतचा अंतिम निर्णय संबंधित संस्थांना कळविणे | मार्च, २०२० |

(क्र. २,३,४ व ५ याबाबतचा कालबध कार्यक्रम विद्यापीठाची विविध प्राधिकरणे आणि विद्यापीठ प्रशासनाच्या मान्यतेवर अवलंबुन राहील.)

Phone - 022-2270 3248
Phone - 022-2270 8729
E-mail - universitythesis2011@gmail.com

# University of Mumbai

**Thesis Section,**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road,
Mumbai – 400 032

कृपया, मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्र. सलग्नता/आय.सी.ई/२०१६–१७/१४ पहावे. सदर परिपत्रकाद्वारे महाविद्यालयाचे संलग्निकीकरण करण्याची प्रक्रिया संगणकाद्वारे करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने महाविद्यालयांमधील संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांचेही मान्यतेचे **(Recognition of Research Centre)** काम संगणकीकरणाद्वारे करावयाचे प्रस्तावित आहे. ज्या महाविद्यालयांनी/संस्थांनी अद्याप पर्यंत ऑनलाईन नोंदणी केलेली नाही, अशा सर्व संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांनी ऑनलाईन नोंदणी करुन **Login ID** व **Password** प्राप्त करुन घेणे आवश्यक असेल. ऑनलाईन नोंदणी **Login ID** व **Password** प्राप्त करुन घेण्यासाठी खालील सुचनांचे पालन करावे.

१. प्रथम **www.muonline.org.in** (Helpline No.07722065283 / 84) या संकेतस्थळाला भेट द्यावी व होमपेज वरील **Get Login for Research Institute** या लिंक वर जावे. (जर संशोधन संस्थेकडे Login ID नसेल तर)

२. आपल्या संस्थेचे नांव, प्राचार्य / संचालकाचे नांव व मोबाइल क्र. नमूद करावा.

३. संशोधन संस्था मान्यतेचे (Latest Recognition Letter) शेवटचे / अलिकडचे पत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी. जर एकापेक्षा जास्त विषयांना मिळालेली असेल, तर प्रत्येक विषयाबाबतचे मान्यतेचे पत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी.

४. आपण सादर केलेल्या मोबाईल क्रमांकावर Passward SMS द्वारे आपणांस कळविण्यात येईल.

५. तदनंतर, सदर Login ID and Passward वापरून ऑनलाईन Ph.D. Online Thesis Section (Ph.D. Research) या बटनावर क्लिक करून आपणांस आवश्यक असलेल्या पर्याय निवडावा.

६. आपल्या संस्थेद्वारे अदा करावयाचा शुल्क रकमेचा तपशिल आपणांस दिसेल. सदर रकमेचा भरणा ऑनलाईन प्रकियेद्वारे करावयाचा आहे व भरलेले शुल्क परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. संगणकावर येणाऱ्या सुचनांप्रमाणे अर्ज संपुर्णपणे भरावा. एखादी बाब लागू नसल्यास Not Applicable असे लिहावे परंतू, कुठलाही रकाना रिकामा ठेवू नये किंवा "–" लिहू नये.

८. अर्जासोबत जोडावयाचे सर्व दस्ताऐवजांची PDF प्रत अपलोड करावी.

९. संपूर्ण अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर Sent to University या लिंकवर क्लिक करून अर्ज विद्यापीठास सादर करावा व संपूर्ण अर्जाच्या प्रतीची Printout घ्यावी व अशा ४ प्रती तयार कराव्यात.

१०. अर्जाची एक प्रत (संपूर्ण दस्तऐवजांसह) पुढील दहा दिवसांच्या आत विद्यापीठास सादर करावी. सदर प्रत प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक असेल. टपालाद्वारे अर्जाची प्रत स्विकारली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Phone - 022-2270 3248
Phone - 022-2270 8729
E-mail - universitythesis2011@gmail.com

# University of Mumbai

Thesis Section,
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road,
Mumbai – 400 032.

११. उर्वरित ३ अर्जाच्या प्रती स्थानिक चौकशी समितीच्या सदस्यांना त्यांच्या भेटीच्या वेळी हस्तांतरीत करावयात.

१२. ऑनलाईन प्रक्रियेत यशस्वीरित्या सादर करण्यात आलेले अर्जच पुढील मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ग्राह्य धरले जातील. **ऑनलाईन अर्ज व अर्ज सादर करण्यात शेवटच्या तारेखेनंतर म्हणजेच दि.३० सप्टेंबर, २०१९, नंतर कोणतेही अर्ज स्विकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक –१७ऑगस्ट, २०१९.

डॉ. विनोद पाटील
संचालक
(परिक्षा व मुल्यामापन मंडळ)

.....

प्रत :–

१. मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील संशोधन केंद्राचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संशोधन संस्थांचे संचालक / आणि संशोधन विभाग तसेच, विद्यापीठ विभागांचे विभागप्रमुख.

२. संचालक, निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हीसेस प्रा.लि. नागपूर, माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीस्तव सादर.